निवडणूक तात्काळ

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१७/का-८
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल : sec.mh@gov.in
दिनांक: १८ सप्टेंबर २०१७

प्रति,
मा. आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र शासन.

**विषय :- ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुका- २०१७**
**... निवडणूक काळात संबंधित ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून स्थानिक पातळीवर प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत.**

**संदर्भ :-** १) आयोगाचे समक्रमांकाचे दि.२१ ऑगस्ट २०१७, दि.०१ व १२ सप्टेंबर २०१७ रोजीचे निवडणूक कार्यक्रमासंबंधातील आदेश.
२) आयोगाचे दि.०६ सप्टेंबर २०१७ चे आदर्श आचारसंहितेसंदर्भातील अतिरिक्त आदेश.

आदरणीय महोदय,

राज्य निवडणूक आयोगाकडून उक्त संदर्भीय आदेशांद्वारे नुकताच राज्यातील सर्व जिल्ह्यांत मुदत संपणाऱ्या सुमारे ८,००० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. (प्रती संलग्न)

२. ग्रामपंचायत निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात विहित मुदतीत पार पाडणे हे आयोगाचे सांविधानिक दायित्व आहे. याद्दष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना आयोगाकडून करण्यात येत आहेत.

३. यासंबंधात आयोगाने दि.०६ सप्टेंबर २०१७ रोजी विशेष करून ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसंदर्भात आदर्श आचारसहितेबाबतचे अतिरिक्त आदेश निर्गमित केले असून त्याची एक प्रत आपणासही पृष्ठांकित करण्यात आलेली आहे. (प्रत संलग्न)

४. मा. आयुक्त यांनी दि.१३ व दि.१४ सप्टेंबर २०१७ रोजीच्या दौऱ्यात नांदेड, अकोला व वाशीम या जिल्ह्यांत सुरू असलेल्या ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रमाचा आढावा घेतला. यावेळी ग्रामपंचायतींची मोठी संख्या व भौगोलीक सलगता लक्षात घेता सीमेलगतच्या राज्यातून तसेच जंगलव्याप्त जिल्ह्यातून निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींच्या ठिकाणी मद्यार्क व अंमली पदार्थ यांची मोठ्या प्रमाणावर अवैध तस्करी होऊन त्याद्वारे मतदारांना प्रलोभित करण्याची शक्यता असल्याचे स्थानिक प्रशासनाकडून व्यक्त झाली असून याबाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त होत आहेत.

५. वरील बाबी लक्षात घेता या निवडणुकांमध्ये अवैध/मोफत दारू इत्यादी वाटपाद्वारे मतदारांवर विपरित परिणाम होणार नाही, यासाठी आपल्या विभागाने सर्व खबरदारी घेणे आवश्यक आहे. याकरिता आपण सर्व उपाययोजना कराव्यात व आपल्या क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांना योग्य त्या सूचना द्याव्यात: (उदा. खालीलप्रमाणे)

(i) जिल्ह्यामध्ये होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची संख्या लक्षात घेता प्रत्येक जिल्ह्याचा स्वतंत्र आराखडा तयार करावा.

(ii) या आराखड्याप्रमाणे सर्व जिल्ह्यामध्ये आवश्यकतेप्रमाणे अधिकचे अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करावी व वाहने उपलब्ध करून द्यावी.

(iii) प्रत्येक जिल्ह्यामध्ये कशाप्रकारे अवैध/मोफत दारू वाटपावर आळा घालता येईल, याबाबत जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक इ. यांच्याशी सल्लामसलत करून जिल्ह्यात येणारे रस्ते, रेल्वे, हवाईअड्डे (विमान/हेलीकॉप्टर) इत्यादींवर निगराणी ठेवण्यात यावी.

(iv) जिल्ह्यामध्ये विक्री केली जाणारी तसेच नदी, खाडी, जंगले इत्यादींमध्ये तयार केली जाणारी अवैध दारूवर नजर ठेवावी इत्यादी.

६. या विषयी राज्य निवडणूक आयोगाने गेल्या २ वर्षांमध्ये आपण व आपल्या अधिकाऱ्यांसमवेत घेतलेल्या बैठकीत दिलेल्या सूचनांचेसुध्दा काटेकोरपणे पालन करावेत. जर कोणत्याही जिल्ह्यामध्ये अवैध/मोफत दारू वाटपामुळे मतदारांवर विपरित परिणाम होण्याचे दिसून आले तर संबंधितांवर कडक कार्यवाही करण्यात येईल, याची आपण नोंद घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( शेखर चन्ने )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. जिल्हाधिकारी (सर्व संबंधित)